ePaper

## अमेरिकेचे मोठे नुकसान! युद्धात गमावली 42 लढाऊ विमाने अन् ड्रोन्स

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज ™



पान 2 वरुन...

पुण्यात पुन्हा टोळीयुद्धाचा भडका!

WWW.MAHAENEWS.COM | गुरूवार, दि. 21 मे 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### सेवामुक्त युद्धनौका ‘आयएनएस गुलदार’ निवती समुद्रतळाशी यशस्वीपणे स्थापित!

# सिंधुदुर्गच्या सागरी पर्यटनात नवा इतिहास!

महाईन्यूज । सिंधुदुर्ग

**सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या सागरी पर्यटनाला जागतिक नकाशावर नेणारा एक अत्यंत महत्त्वाचा आणि ऐतिहासिक टप्पा पूर्ण झाला आहे. मालवण-वेंगुर्ला जवळील निवती रॉक समुद्रात भारताचे पहिले अंडरवॉटर म्युझियम (समुद्राखालील संग्रहालय) आणि आर्टिफिशियल रीफ (कृत्रिम समुद्री प्रवाळ) प्रकल्पासाठी भारतीय नौदलाची सेवामुक्त युद्धनौका ‘आयएनएस गुलदार’ (EX INS GULDAR) समुद्रतळाशी यशस्वीपणे विसर्जित करण्यात आली आहे. गेल्या दीड वर्षांपासून विजयदुर्ग येथे विसर्जनाच्या प्रतीक्षेत असलेल्या या युद्धनौकेची अखेर निवती समुद्रात समुद्रतळापासून सुमारे २२ मीटर खोलीवर सुरक्षितपणे स्थापना करण्यात आली असून, या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झाले आहे.**




महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या कोकण विभागाचे प्रादेशिक व्यवस्थापक दीपक माने यांनी यासंदर्भात अधिकृत माहिती दिली. ते म्हणाले की, “गेले अनेक दिवस आमची टीम यासाठी प्रयत्नशील होती. समुद्रातील खवळलेले वातावरण आणि प्रतिकूल परिस्थितीवर मात करत अखेर ही युद्धनौका दक्षिण दिशेकडे, म्हणजेच गोव्याच्या दिशेने तोंड करून समुद्रतळाशी सुरक्षितपणे स्थापित करण्यात आली आहे.”

८१ मीटर लांब, २२ मीटर उंच आणि १,२०० टन विस्थापन असणारी ‘गुलदार’ ही युद्धनौका मूळची पोलंड देशाची निर्मिती आहे. १९८५ मध्ये ती भारतीय नौदलात सामील झाली होती. श्रीलंका तसेच अंदमान-निकोबार बेटांवर जवळपास चार दशके शौर्याने देशसेवा केल्यानंतर ती सेवानिवृत्त झाली. आता ही नौका पर्यटनाच्या नव्या सेवेत दाखल झाली आहे.

समुद्रतळाशी बुडालेल्या या युद्धनौकेचे प्रवाळ बेटांत रूपांतर होऊन त्यावर सागरी जीवसृष्टीचा नैसर्गिक अधिवास तयार होण्यासाठी साधारण दोन वर्षांचा कालावधी लागणार आहे. या प्रकल्पासाठी गोवा येथील राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्थेमार्फत सखोल वैज्ञानिक अभ्यास करण्यात आला असून, जहाजातील सर्व घातक व प्रदूषणकारक घटक पूर्णपणे हटवून ते पर्यावरणदृष्ट्या सुरक्षित करण्यात आले आहे. सुरक्षेचा उपाय म्हणून जहाजाच्या ५०० मीटर परिसरात मासेमारी आणि अँकर टाकण्यास बंदी प्रस्तावित करण्यात आली आहे.

### स्थानिक रोजगाराला मिळणार मोठी चालना:

या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे सिंधुदुर्ग जिल्ह्याची ओळख आता आंतरराष्ट्रीय स्तरावर “अंडरवॉटर टुरिझम डेस्टिनेशन” म्हणून होणार असून देश-विदेशातील पर्यटक येथे आकर्षित होतील. पर्यटकांना स्कुबा डायव्हिंग, अंडरवॉटर एक्सप्लोरेशन, पाणबुडी पर्यटन, समुद्राखालील फोटोग्राफी आणि सागरी जैवविविधतेचा अनोखा अनुभव घेण्याची संधी मिळणार आहे. यामुळे स्थानिक पातळीवर स्कुबा डायव्हिंग प्रशिक्षण, पर्यटन मार्गदर्शक, बोट सेवा, हॉटेल व्यवसाय आणि इतर पूरक उद्योगांना मोठी चालना मिळून स्थानिक युवकांसाठी रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होणार आहेत. एकूणच जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेला यामुळे मोठी बळकटी मिळणार आहे.

# पुण्यात पुन्हा टोळीयुद्धाचा भडका!

## आंदेकर टोळीकडून एकावर भरदिवसा गोळीबार; पोलीस तपास सुरू

**महाईन्यूज । पुणे**

**शहरात पुन्हा टोळीयुद्धाचा भडका उडाला. माजी नगरसेवकर वनराज आंदेकर याच्या खून प्रकणातील आरोपीच्या भावावर पुणे-सातारा रस्त्यावरील बालाजीनगर परिसरात पिस्तुलातून गोळ्या झाडून कोयत्याने वार करण्यात आल्याची घटना घडली. राजर्षी शाहू बँकेसमोरील एका हॉटेलसमोर ही घटना घडल्याने घबराट उडाली. या घटनेत एक जण गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.**



अक्षय उर्फ बाळा बापू म्हस्के (वय २६, रा. श्री स्वामी समर्थ मंदिराजवळ, सर्व्हे क्रमांक २५, आंबेगाव पठार, धनकवडी) असे गंभीर जखमी झालेल्याचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आंदेकर खून प्रकरणात अक्षय म्हस्के याचा भाऊ आकाश याला उशीर अटक करण्यात आली होती. खून प्रकरणातील आरोपींना आकाश म्हस्के याने मध्य प्रदेशातून पिस्तुले आणून दिली होती. त्यानंतर आकाश याला खून प्रकरणात अटक करण्यात आली होती. आकाश याचा भाऊ अक्षय हा पुणे-सातारा रस्त्यावरील बालाजीनगर परिसरात बुधवारी सकाळी नाश्ता करण्यासाठी आला होता. राजर्षी शाहू बँक चौकात तो थांबला होता. त्या वेळी दुचाकीवरुन आलेल्या हल्लेखोरांनी अक्षय याच्यावर पिस्तुलातून गोळी झाडली. एक गोळी अक्षय याच्या पायात शिरली. हल्लेखोरांनी त्याच्यावर कोयत्याने वार केले. या घटनेत तो गंभीर जखमी झाला. त्याला तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

या घटनेची माहिती मिळताच परिमंडळ दोनचे पोलीस उपायुक्त मिलिंद मोहिते यांनी घटनास्थळी भेट दिली. 'प्राथमिक चौकशीत अक्षय म्हस्के याच्यावर वैमनस्यातून गोळीबार झाल्याची माहिती मिळाली आहे. पसार झालेल्या हल्लेखोरांचा शोध घेण्यासाठी पोलिसांची पथके रवाना करण्यात आली आहेत', अशी माहिती पोलिसांनी दिली.

१ सप्टेंबर २०२४ रोजी नाना पेठेतील डोके तालीम चौकात राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी नगरसेवक वनराज आंदेकर याच्यावर पिस्तुलातून गोळ्या झाडून खून करण्यात आला होता. आंदेकर याचा खून वर्चस्वाचा वाद, तसेच संपतीच्या वादातून करण्यात आला होता. या प्रकरणात सोमनाथ गायकवाड, अनिकेत दूधभाते, वनराज आंदेकर याची बहीण संजीवनी कोमकर, पती जयंत कोमकर आणि दीर गणेश कोमकर यांच्यासह १६ आरोपींना अटक करण्यात आली होती.

त्यानंतर आंदेकर टोळीने वनराज याच्या खुनाचा बदला घेण्यासाठी आरोपी गणेश कोमकर याचा मुलगा आयुष (वय २०, रा. लक्ष्मी सोसायटी, हमाल तालमीजवळ, नाना पेठ) याचा सोसायटीच्या आवारात गोळीबार करुन खून ५ सप्टेंबर २०२५ रोजी केला होता. विसर्जन मिरवणुकीच्या पूर्वसंध्येला आयुष कोमकर याचा खून करण्यात आल्याची घटना घडल्यानंतर शहरात खळबळ उडाली होती. आयुष कोमकर हा आंदेकर टोळीचा म्होरक्या बंडू आंदेकर याचा नातू होता. कोमकर खून प्रकरणात बंडू आंदेकरसह साथीदारांना अटक करण्यात आली होती.

त्यानंतर १ नोव्हेंबर २०२५ रोजी आंदेकर टोळीने बदला घेण्यासाठी आंदेकर खून प्रकरणातील आरोपी समीर काळे याचा भाऊ गणेश किसन काळे (वय ३२, रा. येवलेवाडी, कोंढवा) याचा कोंढव्यातील खडी मशीन चौकात गोळ्या झाडून खून केला होता. गणेश काळे हा रिक्षाचालक होता. वनराज आंदेकर खून प्रकरणातील आरोपींना मध्य प्रदेशातून पिस्तुले आणून दिल्याप्रकरणी समीर काळे, आबा खोंड, आकाश म्हस्के, संगम वाघमारे यांना अटक करण्यात आली होती.

### शहरात दोन दिवसात चौघांचा खुनाचा प्रयत्न


शहरात गेल्या दोन दोन दिवसात चौघांच्या खुनाचा प्रयत्न करण्यात आल्याची घटना घडली. सहकारनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत बुधवारी सकाळी अक्षय काळे याच्यावर गोळीबार करून कोयत्याने वार करण्यात आले. कात्रज बाह्यवळण मार्गावर रिक्षा चालकावर वैमनस्यातून भरदिवसा वार करण्यात आले. कोथरूड भागात एका तरुणावर वैमनस्यातून गजबलेल्या रस्त्यावर कोयत्याने वार करुन खुनाचा प्रयत्न करण्यात आला.

---

# पंतप्रधान मोदींच्या परदेश दौऱ्यात चमकली पुण्यातील तरुण उद्योजिका!

**महाईन्यूज । पुणे**

**भारत-नॉर्वे हरित सामरिक भागीदारी परिषदेत सहभागी होण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उद्योग प्रतिनिधी मंडळातील आघाडीच्या २० जणांमध्ये निवड होण्याचा मान पुण्यातील तरुण उद्योजिकेने पटकावला. त्यांचे नाव आहे आरती भोसले-अहिवळे. त्या पुण्यातील ग्रीनएक्स एन्व्हायर्नमेंटलची संस्थापिका व व्यवस्थापकीय संचालिका आहेत.**





पर्यावरण, सामाजिक जबाबदारी आणि प्रशासन (ईएसजी), हवामान बदल, हरित औद्योगिक परिवर्तन आणि शाश्वत आर्थिक विकास या विषयांवर १८ व १९ मे रोजी या परिषदेत चर्चा झाली. परिषदेला नॉर्वेचे पंतप्रधान जोनास गाहर स्टोरे यांच्यासह दोन्ही देशांतील वरिष्ठ अधिकारी आणि उद्योग प्रतिनिधी उपस्थित होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी, परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल हेही परिषदेत सहभागी झाले होते. दोन्ही देशांच्या पंतप्रधानांसह आयोजित विशेष मेजवानीसाठीही आरती भोसले निमंत्रित करण्यात आले होते. 'ग्रीनएक्स'चे सहसंस्थापक सागर अहिवळे हेही या दौऱ्यात सहभागी झाले आहेत.

या परिषदेत ईएसजी नेतृत्व आणि शाश्वत परिवर्तनावर भाषण करताना आरती भोसले-अहिवळे यांनी ईएसजी ही संकल्पना आता जागतिक व्यापार, गुंतवणूक, पुरवठा साखळी आणि आंतरराष्ट्रीय मानकांशी निगडित अत्यावश्यक बाब बनल्याचे नमूद केले. पर्यावरणीय जबाबदारी आणि नैतिक प्रशासन यांवर आधारित विकासालाच भविष्यात अधिक महत्त्व प्राप्त होईल, असे त्यांनी सांगितले. त्यांची ग्रीनएक्स एन्व्हायर्नमेंटल ही संस्था ईएसजी कन्सल्टिंग, सस्टेनेबिलिटी रिपोर्टिंग, कार्बन फूटप्रिंटिंग, लाइफ सायकल असेसमेंट आणि पर्यावरणीय अनुपालन या क्षेत्रांत कार्यरत आहे. तसेच नॉर्वेतील ईपीडी ग्लोबल या आंतरराष्ट्रीय संस्थेची भारतातील कायदेशीर व्यवसाय भागीदार म्हणूनही संस्था कार्य करते.

या परिषदेमध्ये जगभरातील धोरणकर्ते, वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, उद्योग प्रतिनिधी आणि पर्यावरणीय नेतृत्व करणाऱ्या संस्था एकत्र येऊन भविष्यातील हरित विकासाची दिशा निश्चित करण्यावर चर्चा करतात. या परिषदेमुळे भारत व नॉर्वे यांच्यातील नवीन ऊर्जा, कार्बन न्यूट्रॅलिटी, शाश्वत पुरवठा साखळी, हरित नवोपक्रम व पर्यावरणीय प्रशासन या क्षेत्रांतील सहकार्य अधिक दृढ झाले आहे. भारत–नॉर्वे हरित सामरिक भागीदारी परिषदेच्या समारोप प्रसंगी दोन्ही देशांनी हरित तंत्रज्ञान, हवामान कृती आणि शाश्वत विकासासाठी परस्पर सहकार्य अधिक वाढवण्याचा संकल्प पुन्हा एकदा दृढ केला.

> भारत जगाच्या हरित अर्थव्यवस्थेकडे वेगाने वाटचाल करत असताना, ग्रीनएक्स एन्व्हायर्नमेंटल ही संस्था देशातील उद्योगांना जागतिक ईएसजी मानकांशी जोडणारा, परिवर्तनाचा दिशादर्शक आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करणारा अत्यंत मजबूत पर्यावरणीय नेतृत्वाचा चेहरा म्हणून उदयास येत आहे.
>
> - आरती भोसले-अहिवळे, संस्थापिका, ग्रीनएक्स एन्व्हायर्नमेंटल.

# प्रवीण जैन यांच्या पदोन्नतीसाठी राष्ट्रवादीची शिफारस!

## कथित ६० कोटींच्या उपसूचना भ्रष्टाचार प्रकरणात "सेल्फ गोल"; पदाधिकाऱ्यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

**महाईन्यूज** । पिंपरी-चिंचवड


**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत सुमारे 60 कोटी रुपयांची बिले नियमबाह्य पद्धतीने अदा केल्याचा आरोप असलेले मुख्य लेखा अधिकारी प्रवीण जैन पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहेत. या प्रकरणाला आता नवे राजकीय वळण मिळाले असून, प्रवीण जैन यांना अतिरिक्त आयुक्त (1) पदावर नियुक्ती मिळावी यासाठी थेट राष्ट्रवादीच्या सर्वोच्च नेत्यांसह विधानसभा अध्यक्ष व राष्ट्रवादीचे आमदार आण्णा बनसोडे यांनीही शिफारस झाल्याचे दस्तऐवजांमधून समोर आले आहे.**




या प्रकरणात "भाजपाच्या नगरसेवकांच्या स्वाक्षरी आहेत.." असा दावा करीत राष्ट्रवादीचे विरोधी पक्षनेता भाऊसाहेब भोईर, शहराध्यक्ष तथा नगरसेवक योगेश बहल, नगरसेवक संदीप वाघेरे यांनी सत्ताधारी भाजपाला पत्रकार परिषद घेत 'टार्गेट' केले होते. प्रवीण जैन भाजपासाठी काम करीत आहेत, असा अप्रत्यक्ष 'फेक नॅरेटिव्ह' करण्याचा प्रयत्न केला जात होता. शिवसेना नगरसेविका सुलभा उबाळे यासुद्धा आघाडीवर होत्या.

मात्र, या वादग्रस्त अधिकाऱ्यासाठी थेट तत्कालीन दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार आणि विधानसभा उपाध्यक्ष आण्णा बनसोडे यांनी शिफारस पत्र दिले होते. त्यामुळे जैन यांच्या कथित ६० कोटी रुपयांच्या बोगस उपसूचना प्रकरणात राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांना बोलण्याचा नैतिक अधिकार आहे का? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

या प्रकरणात आणखी महत्त्वाचा खुलासा म्हणजे, आमदार बनसोडेंचे पत्र मिळाल्यानंतर स्व. अजित पवार यांनीही या नियुक्तीबाबत पुढील स्तरावर शिफारस केल्याचे समोर आले आहे. त्यामुळे जो अधिकारी भाजपासाठी काम करीत आहे, असा नॅरेटिव्ह करणारे राष्ट्रवादीचे स्थानिक पदाधिकारी आता तोंडघशी पडले आहेत. कारण, त्यांचे स्थानिक आमदार आणि नेते एका वादग्रस्त अधिकाऱ्याच्या पदोन्नतीसाठी वर्षभरापूर्वी लेखी शिफासर करीत होते, ही बाब उजेडात आली आहे.


महाराष्ट्र विधानसभा | सत्यमेव जयते | अण्णा दादू बनसोडे
आमदार, पिंपरी विधानसभा

जा.क्र.:-D:\MLA CREDOC 2025\उपमुख्यमंत्री\Jan\06 — दिनांक : 06/01/2025

प्रति,
मा. ना. अजितदादा पवार साहेब
उपमुख्यमंत्री तथा अर्थ व नियोजन, उत्पादन शुल्क मंत्री,
महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई 32

यांसी सप्रेम नमस्कार ...

विषय :- श्री. प्रविण डी. जैन, मुख्य वित्त व लेखा तथा संचालक (वित्त) पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांची तीन वर्षासाठी प्रतिनियुक्तीने अतिरीक्त आयुक्त (1) पिंपरी चिंचवड महानगरपालिका येथे बदलीने पदस्थापना देणेबाबत...

आदरणीय महोदय,

उपरोक्त विषयान्वये, श्री. प्रविण देविचंद जैन हे सध्या मुख्य वित्त व लेखा तथा संचालक (वित्त) पिंपरी चिंचवड महानगरपालिका येथे कार्यरत आहेत. त्यांनी यापूर्वी प्रधानमंत्री ग्रामसडक योजना तथा मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेमध्ये वित्तीय सल्लागार तथा उपसचिव म्हणून 3 वर्षे मंत्रालय, मुंबई येथे अतिशय चांगले काम केलेले आहे. त्यांचे मागील 5 वर्षाचे A.C.R. " उत्पुत्कृष्ट " आहे. श्री. प्रविण जैन यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिका येथे अतिरीक्त आयुक्त (1) या पदावर पदस्थापना मिळण्यासाठी विनंती केलेली आहे.

तरी, श्री. प्रविण डी. जैन, मुख्य वित्त व लेखा तथा संचालक (वित्त) पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांची तीन वर्षासाठी प्रतिनियुक्तीने अतिरीक्त आयुक्त (1) पिंपरी चिंचवड महानगरपालिका येथे बदलीने पदस्थापना होणेबाबत विनंती आहे.

कळावे,

आपला विश्वासू,
अण्णा बनसोडे
आमदार, पिंपरी विधानसभा

### आमदार अण्णा बनसोडेंचे पत्र उघड

दिनांक 6 जानेवारी 2025 रोजी पिंपरी विधानसभेचे आमदार अण्णा बनसोडे यांनी तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांना पत्र लिहून, प्रवीण जैन यांच्या अतिरिक्त आयुक्त (1) पदावरील प्रतिनियुक्तीसाठी शिफारस केल्याचे उघड झाले आहे.या पत्रात आमदार बनसोडे यांनी नमूद केले आहे की, प्रवीण देविचंद जैन हे सध्या पिंपरी-चिंचवड महानगरपालिका येथे मुख्य वित्त व लेखा अधिकारी तथा संचालक (वित्त) या पदावर कार्यरत आहेत. त्यांनी यापूर्वी प्रधानमंत्री ग्रामसडक योजना व मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेत वित्तीय सल्लागार व उपसचिव म्हणून मंत्रालय, मुंबई येथे तीन वर्षे उत्कृष्ट कार्य केले आहे. तसेच, त्यांचे मागील पाच वर्षांचे A.C.R. "उत्कृष्ट" असल्याचेही पत्रात नमूद आहे. या आधारे, प्रवीण जैन यांची तीन वर्षांसाठी प्रतिनियुक्तीने अतिरिक्त आयुक्त (1) पदावर बदलीने नियुक्ती करण्यात यावी, अशी स्पष्ट विनंती आमदारांनी केली आहे.

---

# शहर कोंडीमुक्त करण्यासाठी सक्षम 'पार्किंग पॉलिसी' लवकरच; अभिषेक बारणे

**महाईन्यूज** । पिंपरी-चिंचवड

**पिंपरी-चिंचवड शहरातील वाढती वाहनांची संख्या आणि त्यामुळे निर्माण होणारी वाहतूक कोंडी यावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी प्रशासकीय पातळीवर वेगवान हालचाली सुरू झाल्या आहेत. शहरात एक सक्षम आणि शिस्तबद्ध 'पार्किंग पॉलिसी' तयार करण्यासाठी बीआरटीएस विभाग आणि महापालिकेच्या संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत नुकतीच एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. महापालिका आणि पोलीस प्रशासन यांच्या संयुक्त समन्वयाने हे नवे धोरण लवकरच शहरात अंमलात आणले जाणार आहे, अशी माहिती स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी दिली आहे.**



या बैठकीदरम्यान बीआरटीएस विभागाकडून नवीन पार्किंग पॉलिसीचे सविस्तर सादरीकरण (प्रेझेंटेशन) करण्यात आले. या सादरीकरणामध्ये धोरणाची तांत्रिक आणि व्यावहारिक बाजू मांडण्यात आली. त्यावर सर्व बाजूंनी सविस्तर चर्चा झाल्यानंतर, धोरण अधिक लोकाभिमुख आणि त्रुटीरहित करण्यासाठी काही महत्त्वाच्या ठिकाणी आवश्यक दुरुस्त्या व सुधारणा करण्याच्या सूचना स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांच्याकडून देण्यात आल्या. या सूचनांचा समावेश करून हे नवीन पार्किंग धोरण अत्यंत प्रभावीपणे आणि लवकरच अंमलात आणले जाणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

या नव्या पार्किंग धोरणामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा आणि व्यावहारिक उपायांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये प्रत्येक भागाच्या गरजेनुसार 'एरिया बेस्ट पार्किंग' व्यवस्था विकसित केली जाईल, तर नागरिकांच्या सोयीसाठी 'कलर कोडिंग सिस्टीम' लागू केली जाणार आहे. याशिवाय, रस्त्यालगत घर असणाऱ्या स्थानिक रहिवाशांना त्रास होऊ नये म्हणून त्यांना विशेष 'पार्किंग परमिट' दिले जाईल. शहरातील मुख्य रस्त्यांवर होणारी जड वाहनांची पार्किंग पूर्णपणे बंद करून त्यांच्यासाठी शहराबाहेर जागा निश्चित केली जाणार आहे. विशेष म्हणजे, अनावश्यक पार्किंग टाळण्यासाठी थेट सॅटेलाईटद्वारे जागांची पडताळणी करण्यात येणार असून, या संपूर्ण व्यवस्थेवर देखरेख ठेवण्यासाठी स्वतंत्र 'पार्किंग मॅनेजमेंट' कक्ष स्थापन केला जाईल. या धोरणात वाहनचालकांसह पादचारी आणि सायकलस्वारांसाठीही स्वतंत्र व सुरक्षित जागा सुनिश्चित करण्यात आली आहे.

या बैठकीला सहशहर अभियंता बापूसाहेब गायकवाड, कार्यकारी अभियंता सुनील पवार, आयटीडीपी चे प्रतिनिधी आणि इतर प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.


> "पिंपरी-चिंचवड वेगाने वाढणारे शहर असून येथील वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडवण्यासाठी केवळ तात्पुरते उपाय करून चालणार नाही, तर एक शाश्वत आणि शिस्तबद्ध यंत्रणा उभारण्याची गरज आहे. याच उद्देशाने आम्ही या नव्या पार्किंग धोरणावर सविस्तर चर्चा केली आहे. बीआरटीएस विभागाच्या सादरीकरणानंतर त्यात अधिक सुधारणा करण्यासाठीच्या सूचना केल्या आहेत, ज्या या धोरणाला अधिक परिपूर्ण बनवतील. हे धोरण राबवताना केवळ वाहतूक सुरळीत करणे एवढाच हेतू नसून, पादचारी आणि सायकल चालवणाऱ्यांनाही सुरक्षित रस्ते मिळवून देणे हा आमचा प्रयत्न आहे.
>
> **- अभिषेक बारणे, स्थायी समिती सभापती, पिंपरी चिंचवड महापालिका.**



## भूमिका

**भारत आणि इटली यांच्यातील संबंध गेल्या काही वर्षांत अधिक मजबूत झाले असून ते आता धोरणात्मक भागीदारीच्या नव्या टप्प्यावर पोहोचले आहेत. लोकशाही, स्वातंत्र्य आणि मानवकेंद्री विकास या समान मूल्यांवर आधारित ही भागीदारी भविष्यातील जागतिक आव्हानांना सामोरे जाण्यासाठी महत्त्वपूर्ण मानली जात आहे.**

# भारत-इटली संबंधांचा नवा अध्याय



जागतिक व्यवस्थेमध्ये वेगाने बदल होत असताना दोन्ही देश आर्थिक, तांत्रिक आणि सांस्कृतिक सहकार्य वाढवण्यावर भर देत आहेत. इटलीचे औद्योगिक कौशल्य, डिझाईन आणि प्रगत तंत्रज्ञान यांची सांगड भारताच्या वेगवान आर्थिक विकास, अभियंता कौशल्य आणि स्टार्टअप परिसंस्थेशी घातली जात आहे. “मेक इन इंडिया” आणि “मेड इन इटली” या उपक्रमांमधील सहकार्यामुळे उत्पादन, गुंतवणूक आणि पुरवठा साखळी अधिक बळकट होण्याची अपेक्षा आहे. दोन्ही देशांनी 2029 पर्यंत व्यापार 20 अब्ज युरोपर्यंत नेण्याचे लक्ष्य ठेवले आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता, क्वांटम संगणन, डिजिटल पायाभूत सुविधा आणि हरित तंत्रज्ञान या क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढवणे हे या भागीदारीचे केंद्रस्थान आहे. भारताची डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा आणि इटलीचे प्रगत औद्योगिक सामर्थ्य यामुळे नव्या तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात मोठ्या संधी निर्माण होत आहेत. दोन्ही देश कृत्रिम बुद्धिमत्तेचा विकास मानवकेंद्री आणि जबाबदार पद्धतीने व्हावा यासाठी प्रयत्नशील आहेत. तंत्रज्ञानाचा उपयोग लोकशाही, मानवी प्रतिष्ठा आणि सामाजिक सक्षमीकरणासाठी व्हावा, हा दोन्ही देशांचा समान दृष्टिकोन आहे.

संरक्षण, सायबर सुरक्षा, अंतराळ संशोधन आणि सागरी सुरक्षेमध्येही भारत आणि इटली सहकार्य वाढवत आहेत. दहशतवाद, सायबर गुन्हे, मानवी तस्करी आणि आंतरराष्ट्रीय गुन्हेगारीविरोधात संयुक्तपणे काम करण्यावर भर दिला जात आहे. अंतराळ तंत्रज्ञान आणि एरोस्पेस क्षेत्रात दोन्ही देशांच्या क्षमता एकत्र आल्यास नवीन संशोधन आणि उद्योगांना चालना मिळू शकते.

ऊर्जा क्षेत्रातही दोन्ही देश महत्त्वपूर्ण भागीदारी करत आहेत. अक्षय ऊर्जा, हरित हायड्रोजन, स्मार्ट ग्रीड्स आणि शाश्वत पायाभूत सुविधांमध्ये सहकार्य वाढवण्याचा मानस आहे. भारताच्या हरित ऊर्जा उपक्रमांना इटलीच्या प्रगत तंत्रज्ञानाची जोड मिळणार आहे. तसेच आंतरराष्ट्रीय सौर आघाडी आणि जागतिक जैवइंधन आघाडी यांसारख्या उपक्रमांमधील सहकार्यालाही महत्त्व आहे.

भारत आणि इटली हे इंडो-पॅसिफिक आणि भूमध्य समुद्र या दोन महत्त्वाच्या भौगोलिक क्षेत्रांना जोडणारे देश आहेत. त्यामुळे “इंडो-मेडिटेरेनियन” या नव्या संकल्पनेतून व्यापार, ऊर्जा, तंत्रज्ञान आणि संपर्क वाढवण्याची संधी निर्माण होत आहे. इंडिया-मिडल ईस्ट-युरोप इकॉनॉमिक कॉरिडॉर हा या सहकार्याचा महत्त्वाचा भाग मानला जात आहे. सांस्कृतिक मूल्ये, मानवतावाद आणि परस्पर सन्मान यांच्या आधारावर भारत-इटली भागीदारी अधिक मजबूत आणि भविष्याभिमुख बनत आहे.

## प्रासंगिक »

### उंदीर आणि सिंहीण

**आमची पुढची कथा अजून छान आहे. उंदीर आणि सिंहीणीची ही कथा कधीही जुनी होत नाही. आपल्याला माहितीच आहे की सिंहीण ही एक उग्र, गर्विष्ठ प्राणी आहे. लहान प्राण्यांकडे सिंहीण कायम तुच्छतेने पाहत असे.**

अशीच एक सिंहीण एकदा जंगलात फिरत असताना तिच्या पंजामध्ये काटा घुसला. गर्विष्ठ असल्यामुळे सिंहीणीने मदत न मागण्याचा निर्णय घेतला. ती अशक्त होऊन रक्तस्त्राव होत असताना सुद्धा जंगलामध्ये फिरत राहिली. एके दिवशी, तिला एका नम्र उंदीर भेटला. सिंहिणीला खूप वेदना होत होत्या. उंदीर जरी घाबरला असला तरी मदत देण्याइतपत धैर्यवान होता. लहान उंदीर सिंहिणीच्या पंजातून काटा काढण्यात यशस्वी झाला आणि तिला वेदनांपासून मुक्त केले. जरी सिंहीण खूप मोठी आणि सामर्थ्यवान होती, आणि उंदीर इतका लहान आणि नम्र होता, तरीही उंदराच्या दयाळूपणामुळे सिंहिणीचे प्राण वाचवले.

- तात्पर्य :

नम्र व्हा आणि कधीही विसरू नका की तुमचा आकार आणि शक्ती किंवा उपयुक्ततेची हमी नसते.

केरळमच्या मुख्यमंत्रिपदी व्ही. डी. सतीशन यांची निवड झाल्यानंतर राज्यात काँग्रेसप्रणित यूडीएफच्या नव्या सत्तापर्वाला सुरुवात झाली आहे.

# संधी अन् आव्हान

या विजयामुळे काँग्रेसला दक्षिण भारतात आणखी बळ मिळाले असून कर्नाटक, तेलंगणा आणि आता केरळमधील सत्ता पक्षासाठी राजकीयदृष्ट्या महत्त्वाची ठरत आहे. तामिळनाडूमध्येही काँग्रेस सत्तेत सहभागी आहे. त्यामुळे दक्षिण भारतात काँग्रेसचा प्रभाव वाढत असल्याचे स्पष्ट दिसते.

केरळम हे देशातील सर्वाधिक साक्षर आणि राजकीयदृष्ट्या जागरूक राज्य मानले जाते. अशा राज्यात सत्ता मिळणे काँग्रेससाठी मोठी संधी आहे. मात्र, त्याचवेळी पक्षासमोर अनेक आव्हानेही आहेत. राज्यातील नेतृत्वासाठी काँग्रेसमध्ये मोठी स्पर्धा होती. तरीही आक्रमक आणि जनाधार असलेले व्ही. डी. सतीशन यांच्यावर पक्षाने विश्वास दाखवला. त्यामुळे काही ज्येष्ठ नेत्यांमध्ये नाराजी निर्माण झाल्याचे दिसते. ही नाराजी दूर करून पक्षातील गटबाजी रोखणे, हे सतीशन यांच्यासमोरील पहिले मोठे आव्हान असेल.

सतीशन हे 2001 पासून सातत्याने विधानसभेवर निवडून येत आहेत. विरोधी



पक्षनेते म्हणून त्यांनी भ्रष्टाचारविरोधात आक्रमक भूमिका घेतली होती. त्यामुळे स्वच्छ आणि पारदर्शक नेतृत्व अशी त्यांची प्रतिमा निर्माण झाली आहे. आता मुख्यमंत्री म्हणून त्यांना सुशासन, पारदर्शकता आणि जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यावर भर द्यावा लागणार आहे. राहुल गांधी यांनी नव्या पिढीतील नेतृत्वाला संधी देण्याच्या दृष्टीने सतीशन यांची निवड केली असल्याचे मानले जाते. त्यामुळे या नेतृत्वाने जनतेचा विश्वास टिकवणे महत्त्वाचे ठरणार आहे.

केरळमसमोर आर्थिक आणि पर्यावरणीय आव्हानेही गंभीर आहेत. राज्यात कर्ज, महसुली तूट आणि बेरोजगारीच्या समस्या वाढत आहेत. अशा परिस्थितीत मोफत योजनांचा वाढता बोजा अर्थव्यवस्थेवर ताण निर्माण करू शकतो. महिलांसाठी मोफत बसप्रवासासारख्या योजना लोकप्रिय असल्या, तरी त्यांचा दीर्घकालीन आर्थिक परिणाम लक्षात घ्यावा लागेल.

पर्यावरणाचा मुद्दाही अत्यंत महत्त्वाचा आहे. केरळममध्ये वाढती विकासकामे, जंगलतोड आणि अनियंत्रित बांधकामांमुळे ढगफुटी व भूस्खलनाच्या घटना वाढताना दिसत आहेत. पर्यटन हा राज्याच्या महसुलाचा प्रमुख स्रोत असल्याने विकास आणि पर्यावरण यांच्यात संतुलन राखणे सरकारसाठी आवश्यक ठरेल.

धार्मिकदृष्ट्याही केरळम संवेदनशील राज्य आहे. हिंदू, मुस्लिम आणि ख्रिश्चन समाजामध्ये सामाजिक समतोल राखत ध्रुवीकरणाला आळा घालणे, हे यूडीएफ सरकारसमोरील आणखी एक महत्त्वाचे आव्हान असेल. दक्षिण भारतातून राष्ट्रीय स्तरावर पुनरागमन करण्यासाठी काँग्रेसला केरळमची सत्ता महत्त्वाची ठरू शकते. मात्र, त्यासाठी पक्षाला सुशासन, संघटनबांधणी आणि विकासाचा समतोल राखावा लागेल.

## ।। अभंगवाणी ।।



ओलें मूळ भेदी खडकाचें अंग ।
आभ्यासासी सांग कार्यसिद्धी ॥१॥

नव्हे ऐसें कांहीं नाहीं अवघड ।
नाहीं कईवाड तोंच वरि ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# कोकण किनारपट्टीवर पुन्हा पावसाचा अंदाज

## बागायतदार धास्तावले; रायगडात शेवटचा आंबा काढणीची लगबग

**महाईन्यूज** | अलिबाग

**गेल्या काही दिवसांपासून सातत्याने बदलणाऱ्या हवामानामुळे आधीच संकटात सापडलेला कोकणातील आंबा बागायतदार आता पुन्हा एकदा मोठ्या चिंतेत सापडला आहे. हवामान विभागाने कोकण विभागात पावसाचा अंदाज वर्तवला असून, यामुळे बागायतदारांची धडधड वाढली आहे. जर वादळी वाऱ्यासह पाऊस झाला, तर हातातोंडाशी आलेला घास हिरावला जाण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.**



भारतीय हवामानशास्त्र विभागाच्या मुंबई प्रादेशिक केंद्राने कोकण किनारपट्टी आणि मुंबई परिसरातील जिल्ह्यांसाठी अधिकृत हवामान अंदाज जाहीर केला आहे. या अंदाजानुसार, कोकणात पुढील दोन ते तीन दिवस मुसळधार ते मध्यम स्वरूपाचा पाऊस आणि वादळी वाऱ्याचा 'यलो अलर्ट' देण्यात आला असून, रायगड आणि ठाणे जिल्ह्यातही काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह हलक्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

पावसामुळे केवळ आंबा गळतीचेच संकट नाही, तर बाजारातील गणितेही बिघडण्याची शक्यता आहे. पाऊस पडल्यास आंब्याची गुणवत्ता घसरते, डाग पडतात आणि तो सडण्याचा धोका वाढतो. परिणामी, बाजारात आंब्याचे दर कमालीचे कोसळू शकतात. आधीच कमी उत्पादनामुळे आर्थिक अडचणीत असलेला बागायतदार, दर घसरल्यास पूर्णपणे कोलमडून जाईल, अशी भीती व्यक्त केली जात आहे. सध्या शेतकरी आणि बागायतदार हवामानाचा अंदाज घेऊन जसा जमेल तसा आंबा उतरवून सुरक्षित ठिकाणी ठेवण्यासाठी लगबग करत आहेत, परंतु, निसर्गाच्या या लहरीपणापुढे आता बागायतदार हतबल झाले असून, सर्वांचे डोळे आभाळाकडे लागले आहेत.

### बागायतदारांसाठी प्रशासनाचे आवाहन

विजांच्या कडकडाटासह आणि वादळी वाऱ्यासह होणाऱ्या या पावसामुळे आंबा, काजू तसेच काढणीस आलेल्या पिकांचे नुकसान होऊ नये म्हणून शेतकऱ्यांनी योग्य ती खबरदारी घ्यावी. तसेच वादळाच्या वेळी झाडांखाली किंवा खुल्या मैदानात आश्रय घेणे टाळावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

### आंबा उत्पादन क्षेत्र किती?

रायगड जिल्ह्यात आंबा लागवडीखालील क्षेत्र ४२ हजार हेक्टर आहे. त्यापैकी १४ हजार ५०० हेक्टर क्षेत्र उतपदनक्षम आहे. मात्र यंदाच्या हंगामात निसर्गाच्या लहरीपणामुळे आंब्याचे उत्पादन आधीच कमालीचे घटले आहे. अनेक भागांत झाडांवर मोजकाच आंबा शिल्लक आहे. त्यातच अजूनही बहुतांश बागायतदारांचा आंबा काढणीचा अंतिम टप्पा बाकी आहे. अशा परिस्थितीत जर वादळी वाऱ्यासह पाऊस कोसळला, तर झाडावर राहिलेला आंबा मोठ्या प्रमाणावर गळून पडेल, असा भीतीयुक्त अंदाज वर्तवला जात आहे.

# मुंबई गोवा महामार्गावर भीषण अपघात; कार ३० फूट दरीत कोसळली

**महाईन्यूज** | रत्नागिरी

**मुंबई-गोवा महामार्गावर वालोपे येथे बुधवारी पहाटे झालेल्या भीषण अपघातात एका व्यक्तीचा मृत्यू झाला असून पाच जण जखमी झाले आहेत. जखमींमध्ये दोन लहान बालकांचाही समावेश असल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने कार थेट २५ ते ३० फूट खोल दरीत कोसळल्याची माहिती मिळाली आहे.**



मिळालेल्या माहितीनुसार, मारुती कंपनीची इर्टिका (एमएच ०८ बी ई १७४२) या क्रमांकाची कार मुंबईहून चिपळूणच्या दिशेने येत होती. बुधवार, २० मे रोजी पहाटे सुमारे ४.२५ वाजण्याच्या सुमारास वालोपे येथील एचपी पेट्रोल पंपासमोर आल्यानंतर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. भरधाव वेगातील कार रस्त्याच्या कडेला असलेल्या कठड्याला धडकून थेट खोल दरीत कोसळली. अपघाताचा आवाज ऐकताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले.चालकाला डुलकी लागल्याने हा अपघात झाला असावा असा अंदाज वर्तविण्यात येत आहे.

या अपघाताची माहिती मिळताच चिपळूण येथील गव्हर्नमेंट रेस्ट हाऊसजवळ कार्यरत असलेल्या रामानंदाचार्य नरेंद्राचार्य संस्थेची रुग्णवाहिका तातडीने घटनास्थळी दाखल झाली. स्वयंसेवक आणि स्थानिकांच्या मदतीने जखमींना बाहेर काढण्यात आले. त्यानंतर जखमींना प्राथमिक उपचार देऊन पुढील उपचारासाठी लाईफ केअर हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. काही वेळाने पोलीसांनी घटनास्थळी जावून मदतकार्य केले. तसेच खोळंबलेली वाहतूक सुरुळीत करुन महामार्ग मोकळा केला.

या भीषण अपघातात संजय जाधव (रा. मार्कंडी) यांचा जागीच मृत्यू झाला. त्यांचा मृतदेह पुढील वैद्यकीय आणि कायदेशीर प्रक्रियेसाठी कामथे सरकारी रुग्णालयात हलविण्यात आला. अपघातातील जखमींमध्ये अप्रिन सावंत (वय ४४, मुंबई), रीधा मोडक (वय २८, मुंबई), उजेर मुल्ला (वय ९, चिपळूण), रिया मुल्ला (वय ३६, चिपळूण) आणि आईल मुल्ला (वय ४, चिपळूण) यांचा समावेश आहे. सर्व जखमींवर सध्या उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात आले.

### महामार्गावरील सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

दरम्यान, या अपघातामुळे मुंबई-गोवा महामार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती. अपघातग्रस्त वाहन बाहेर काढण्यासाठी आणि बचावकार्यामुळे वाहतुकीची कोंडी निर्माण झाली होती. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत वाहतूक सुरळीत केली. या घटनेमुळे महामार्गावरील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून वाहनचालकांनी सावधगिरी बाळगण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# पिसाळलेल्या कुत्र्यांना दयामरणाची परवानगी

## भटक्या कुत्र्यांच्या निर्बीजीकरणाचा निकाल सर्वोच्च न्यायालयाकडून कायम

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**पिसाळलेल्या, अतिशय आजारी किंवा मानवी जीवनासाठी धोकादायक असलेल्या भटक्या कुत्र्यांना दयामरण देण्याची परवानगी सर्वोच्च न्यायालयाने दिली. न्या. विक्रम नाथ, न्या. संदीप मेहता आणि न्या. एन. व्ही. अंजारिया यांच्या खंडपीठाने मंगळवारी हा निकाल दिला. सर्वोच्च न्यायालयाने पहिल्यांदाच कुत्र्यांना दयामरण देण्याची अनुमती दिली आहे.**



त्याचवेळी, सन्मानाने जगण्याच्या अधिकारामध्ये कुत्र्यांनी हल्ला करून दंश करण्याच्या भीतीपासून मुक्तपणे फिरण्याच्या अधिकाराचाही समावेश आहे, असे सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी स्पष्ट केले. सर्वोच्च न्यायालयाने गेल्या वर्षी दिलेल्या निकालामध्ये दिल्ली आणि राष्ट्रीय राजधानी प्रदेशातील सर्व भटक्या कुत्र्यांची रवानगी आश्रय केंद्रांमध्ये करण्याचे तसेच त्यांचे निर्बीजीकरण करण्याचे आदेश दिले होते. त्याला आव्हान देणार्या याचिका सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी फेटाळल्या.

देशातील भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या संख्येच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी न्यायालयाने अनेक निर्देश जारी केले. भटक्या कुत्र्यांना दयामरण देण्याचा आपला आदेश हा पालिका आणि महापालिकेच्या अधिकार्यांना देण्यात येणारा सर्वात महत्त्वाचा आदेश आहे, असे न्यायालयाने यावेळी नमूद केले. ज्या भागांमध्ये भटक्या कुत्र्यांची संख्या चिंताजनक प्रमाणापर्यंत पोहोचली आहे आणि जिथे वारंवार कुत्र्यांनी चावण्याच्या किंवा हल्ला करण्याच्या घटनांमुळे सार्वजनिक सुरक्षेला सतत धोका निर्माण झाला आहे, त्या ठिकाणी अधिकारी दयामरणाचा उपाय वापरू शकतात, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

अर्हताप्राप्त पशुतज्ज्ञांनी मूल्यांकन केल्यानंतर दयामरणाचा निर्णय तसेच अन्य कायदेशीर उपाय करता येतील. यासाठी १९६०चा प्राण्यांवरील क्रूरता प्रतिबंधक कायदा, प्राणी जन्म नियंत्रण नियम, २०२३ आणि अन्य लागू वैधानिक नियम यांचे काटेकोरपणे पालन झाले पाहिजे असेही न्यायालयाने स्पष्ट केले. नागरिकांच्या जीविताला धोका असल्यास ठोस आणि कोणत्याही तडजोडीविना पावले उचलण्याची जबाबदारी राज्यांवर असल्याचे न्यायमूर्ती म्हणाले.

७ नोव्हेंबरला सुनावणीदरम्यान शैक्षणिक संस्था, रुग्णालये आणि रेल्वे स्थानकांसारख्या ठिकाणी श्वानदंशाच्या घटनांमध्ये चिंताजनक वाढ झाल्याची नोंद घेतली होती. भटक्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण आणि लसीकरण करून त्यांचे निहित आश्रयस्थानांमध्ये स्थानांतरण करावे, असे निर्देश न्यायालयाने दिले होते. या कुत्र्यांना परत त्यांच्या मूळ जागी सोडता कामा नये, असेही न्यायालयाने बजावले होते. न्यायालयाच्या त्या निकालाविरोधात प्राणी अधिकार कार्यकर्ते आणि इतरांनी न्यायालयात याचिका दाखल केल्या होत्या.

### एसओपीला आव्हान

याचिकाकर्त्यांनी दाखल केलेल्या याचिकांमध्ये भारतीय प्राणी कल्याण मंडळाने (एडब्ल्यूबीआय) भटक्या जनावरांच्या संदर्भात जारी केलेल्या कार्यपद्धतीच्या (एसओपी) वैधतेला आव्हान देण्यात आले होते. भटक्या कुत्र्यांची समस्या हाताळण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्यात राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांकडून सातत्यपूर्ण प्रयत्नांचा अभाव असल्याची तक्रार या याचिकांमध्ये करण्यात आली होती.



# अमेरिकेचे मोठे नुकसान! इराणविरोधातील युद्धात गमावली ४२ लढाऊ विमाने अन् ड्रोन्स

**महाईन्यूज । अमेरिका**

**इराणचे हवाई दल, नौदल पूर्णपणे उद्ध्वस्त झाल्याचा दावा करणाऱ्या अमेरिकेला देखील या संघर्षात मोठा तोटा सहन करावा लागला आहे. इराणविरोधातील संघर्षात अमेरिकेने ४२ विमानं गमावली असून, यात लढाऊ विमानं आणि ड्रोन्सचा देखील समावेश आहे. अमेरिकेने इराणविरुद्ध ऑपरेशन एपिक फ्युरी सुरु केल्यानंतर विमानं गमावली असल्याची माहिती एका अहवालातून समोर आली आहे.**



अमेरिका आणि इस्रायलने २८ फेब्रुवारी रोजी इराणविरुद्ध लष्करी कारवाई सुरु केली. हल्ल्याच्या पहिल्याच दिवशी इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी आणि अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांचा मृत्यू झाला. प्रत्युत्तरात इराणने देखील अमेरिकाच्या आखाती देशातील तळांवर हल्ले केले. अमेरिकेने इराणच्या लष्कराचे मोठे नुकसान झाल्याचा दावा केला. दरम्यान, या संघर्षात अमेरिकेचे देखील मोठे नुकसान झाल्याचे आता काँग्रेशनल रिसर्च सर्व्हिसच्या अहवालातून समोर आले आहे. या अहवालानुसार अमेरिकेने ४२ विमानं गमावली आहेत. दरम्यान, या संख्येत बदल होण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली आहे.

काँग्रेशनल रिसर्च सर्व्हिस अमेरिकन काँग्रेस आणि समित्यांना धोरणात्मक आणि कायदेशीर विश्लेषण सेवा प्रदान करते. सीआरएसने, संरक्षण विभाग आणि अमेरिकन सेंट्रल कमांडच्या बातम्या आणि निवेदनांचा अभ्यास करून इराण विरोधातील संघर्षात झालेल्या नुकसानीची माहिती संकलित केली आहे. अमेरिकेला या संघर्षात नुकसानीबरोबर मोठा आर्थिक तोटा देखील झाल आहे. यामुळे अमेरिकेने संरक्षण खर्चात देखील मोठी वाढ केल्याची माहिती समोर आली आहे.

हाऊस आर्म्ड सर्व्हिसेस कमिटीची २९ एप्रिल रोजी सुनावणी पार पडली होती. यावेळी अमेरिकेने इराणविरोधातील युद्धावर २५ अब्ज डॉलर्स खर्च केल्याची माहिती देण्यात आली. हा खर्च प्रामुख्याने दारुगोळा आणि उपकरणांच्या देखभालीसाठी वापरण्यात आला होता, असेही यावेळी स्पष्ट करण्यात आले होते. परंतु या युद्धाचा खर्च सुमारे २९ अब्ज डॉलर्सवर पोहोचला असल्याची माहिती पेंटागॉनचे सर्वोच्च अर्थसंकल्पीय अधिकारी ज्युल्स हर्स्ट यांनी काँग्रेसला दिली होती. ४ अब्ज डॉलर्सनी वाढलेला खर्च उपकरणांची दुरुस्ती, पार्ट बदली करणे यासह विविध गोष्टींवर खर्च करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

### कोणती विमानं गमावली?

काँग्रेशनल रिसर्च सर्व्हिसच्या अहवालातून समोर आलेल्या माहितीनुसार अमेरिकेच्या खालील विमानांचे नुकसान झाले आहे.

एफ-१५ ई स्ट्राईक ईगल लढाई विमान – चार विमानं
एक एफ ३५ ए लढाऊ विमान
ए-१० थंडरबोल्ट २
केसी-१३५ स्ट्रॉटोटँकर – एकूण सात
ई-3 विमान एक
एमसी -१३० जे – २ विमानं
एचएच -६० डब्ल्यु – १
तसेच एमक्यू -९ – २४ ड्रोन
एमक्यू – ४ सी – एक ड्रोन

# क्रिती सोबतच्या कॅटफाइट्सच्या चर्चेवर स्पष्टच बोलली रश्मिका



हिंदी सिनेमात दोन अभिनेते एकत्र काम करत असतील; तर जेवढी चर्चा होत नाही, तितकी चर्चा दोन अभिनेत्रींच्या एकत्र येण्यानं होते. आगामी ' कॉकटेल २ ' या सिनेमात क्रिती सॅनन आणि रश्मिका मंदाना या दोघी एकत्र काम करत आहेत. शाहिद कपूर या सिनेमाचा नायक आहे. आता दोन अभिनेत्री एकत्र आल्यावर चर्चा आणि स्पर्धा याबद्दल गॉसिप रंगणारच. मात्र, रश्मिका आणि क्रिती या दोघांचंही म्हणणं थोडं वेगळं आहे. अभिनेत्रींमध्ये स्पर्धा असली, तरी ही स्पर्धा आमचं काम अधिक चांगलं करणारी आहे, असं या दोघी म्हणतात. 'दोन अभिनेत्रींच्या एकत्र येण्याची कायम तुलना होते. भूमिकेची लांबी-रुंदी, स्टायलिंग आणि सिनेमातली त्यांची भूमिका या सगळ्याबद्दल बोललं जातं. मात्र, त्या दोघींनी एकत्र येऊन किती चांगलं काम केलंय, याची चर्चा दुय्यम ठरते. आमच्यात स्पर्धा असली, तरी ही स्पर्धा खूपच सकारात्मक होती आणि ती फक्त कॅमेऱ्यासमोर होती,' असं रश्मिका सांगते. 'दोन अभिनेत्रींची कामाची पद्धत वेगळी असते. सिनेमातल्या त्यांच्या भूमिका वेगळ्या असतात. असं असूनही त्या दोघी प्रेक्षकांना आवडल्या, तर हे त्या अभिनेत्रींचं यश असतं. सेटवर अतिशय खेळीमेळीचं वातावरण आणि मजा आली. आपापल्या भूमिकांचं बलस्थानं ओळखून आम्ही काम केलं आणि दोघींचंही काम चांगलं झालं आहे. स्पर्धा एकमेकींना प्रोत्साहन देत उत्तम काम करण्याची होती,' असं क्रिती सांगते. आता हा सिनेमा आल्यावर त्यांनी नेमकं काय केलंय, हे कळेल! या सिनेमातील दोन्ही अभिनेत्रींच्या लूक आणि भूमिकांबाबत चाहत्यांमध्ये आधीपासूनच मोठी उत्सुकता पाहायला मिळत आहे. सोशल मीडियावरही या जोडीची चर्चा सुरू असून, अनेकांनी या फ्रेश पेअरिंगचं स्वागत केलं आहे.



# कंगणाचा मोलाचा सल्ला

भोपाळमधील ट्विशा शर्मा आणि ग्रेटर नोएडामधील दीपिका नगर या दोन तरुण महिलांच्या संशयास्पद मृत्यूनंतर संपूर्ण देशात खळबळ उडाली आहे. हुंडाबळी, घरगुती हिंसाचाराच्या या घटनेनंतर देशभरातून संताप व्यक्त केला जात आहे. या घटनेनंतर हुंडाबळी आणि घरगुती हिंसेच्या वाढत्या घटनांवर कठोर कायद्यांची अंमलबजावणी करण्याची मागणी जोर धरत आहे. या घटनेवर बॉलिवूड अभिनेत्री आणि भाजप खासदार कंगना रणावतने प्रतिक्रिया देत तरुण मुलींना आणि महिलांना एक महत्त्वाचा सल्ला दिला आहे. कंगनाने दोन्ही प्रकरणांवर प्रतिक्रिया देताना भारतीय समाजातील एका कटू वास्तव समोर आणलं आहे. पोस्ट करत कंगनानं लिहिलं की, “दररोज विवाहित तरुण महिलांबद्दल अत्यंत दुःखद बातम्या समोर येत आहेत. अनेक सुशिक्षित मुली अशा प्रकारच्या दुर्घटना घडण्यापूर्वी आपल्या पालकांकडं मदतीची याचना करतात, त्यांना या परिस्थितीतून बाहेर काढण्यासाठी गयावया करतात. परंतु, आपला भारतीय समाज मुलींचं लग्न झाल्यानंतर त्यांना सासरी एकटं सोडून देण्यासाठी बदनाम आहे. पुढे कंगनानं तरुणींना आत्मनिर्भर होण्याचं आवाहन करत म्हंटले की, “तुमच्या आयुष्यात कोणत्याही व्यक्तीपेक्षा तुमचं करिअर सर्वात जास्त महत्त्वाचं आहे. जोपर्यंत तुम्ही आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होत नाही, तोपर्यंत लग्नाचा विचारही करू नका. संकटात, अडचणींत असाल तर तुम्हाला वाचवायला कोणीही येणार नाही, हे लक्षात ठेवा. तुम्ही काय करता आणि स्वतः काय आहात, हे तुम्ही कोणाशी लग्न करता यापेक्षा कितीतरी पटीनं महत्त्वाचे आहे. तुम्हाला हवं तसं आयुष्य स्वतः घडवा. अशा परिस्थितीत कोणाचेही ऐकू नका,” असा सल्ला कंगणाने दिला आहे. तिच्या या भुमिकेचे अनेकांकडून कौतुक करण्यात आले.



# मंदानानं सांगितली आपबिती

मनोरंजन विश्वाच्या झगमगाटात अनेक वेदनादायक रहस्ये दडलेली असतात. काही अभिनेते किंवा अभिनेत्री त्यांच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल भाष्य करतात. लोकप्रिय अभिनेत्री मंदाना करीमीनं 'लॉक अप' या रिॲलिटी शोमध्ये असाच एक धक्कादायक खुलासा केला. मंदाना करीमीनं सांगितलेलं की, ती इंडस्ट्रीतील एका प्रसिद्ध चित्रपट निर्मात्यासोबत रिलेशनशिपमध्ये होती. त्यावेळी मंदानाचा कायदेशीर घटस्फोट झाला नसल्यामुळे त्यांनी हे नातं लपवून ठेवलं. करोनामध्ये लॉकडाऊन दरम्यान मंदाना करीमी निर्मात्यासोबत लिव्ह-इनमध्ये राहत होती. मंदानानं सांगितलं की, त्या व्यक्तीनं तिला मोठी आश्वासनं दिली होती. निर्माता मंदानाला जोडीदार मानायचा आणि तिनं त्याच्यावर विश्वासही ठेवला. मंदानानं सांगितलं की, दोघांनी त्यांच्या भविष्याची स्वप्नही पाहिलेली. पण मंदाना गरोदर राहताच, त्या माणसाचा दृष्टिकोन पूर्णपणे बदलला आणि त्यानं अभिनेत्रीचा विश्वासघात केला. गरोदरपणाबद्दल ऐकल्यावर, त्या चित्रपट निर्मात्यानं बाळाला स्वीकारण्यास स्पष्टपणे नकार दिला. पुन्हा वडील होण्यासाठी आपण भावनिकदृष्ट्या तयार नाही, हे कारण त्यानं सांगितलं. चित्रपट निर्मात्याला त्याच्या आधीच्या लग्नापासून एक मूल होतं. मंदानानं सांगितलं की, तो माणूस तिला तिच्या मैत्रिणींच्या घरी घेऊन गेला. तिथे त्यानं मंदानाच्या मैत्रिणींना पटवून देण्यासाठी एक योजना आखली होती.



# प्रज्ञानंदची वेस्ली सोशी बरोबरी

## व्हिन्सेंट कीमरने अर्ध्या गुणाची आघाडी कायम राखली

**महाईन्यूज । रोमानिया**




**ग्रँड चेस टूरचा एक भाग असलेल्या ‘सुपर चेस क्लासिक’ स्पर्धेच्या पाचव्या फेरीत ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंदने अमेरिकेच्या वेस्ली सोसोबत बरोबरी साधली. हा त्याचा चौथा अनिर्णीत सामना आहे.**

कोणताही सामना निर्णायक न ठरलेल्या या दिवशी जर्मनीच्या व्हिन्सेंट कीमरने आपली अर्ध्या गुणाची आघाडी कायम राखली आणि तो 3.5 गुणांसह पुढे राहिला. प्रज्ञानंद दुसऱ्या स्थानावर असून तो नेदरलँड्सच्या अनिश गिरी आणि जॉर्डन व्हॅन फोरेस्ट या जोडीसोबत संयुक्तपणे हे स्थान भूषवत आहे. फ्रान्सचा मॅक्सिम वाशियर-लाग्रेव्ह आणि वेस्ली सो प्रत्येकी 2.5 गुणांसह पाचव्या स्थानावर संयुक्तपणे आहेत. तर अमेरिकेचा फॅबियानो काऊआना आणि जागतिक अजिंक्यपद स्पर्धेतील आव्हानवीर उझबेकिस्तानचा जावोखिर सिंदारोव्ह हे दोन गुणांसह त्यांच्या मागोमाग आहेत. मात्र सिंदारोव्हचा एक सामना अजून बाकी आहे. रोमानियाचा बोगदान-डॅनियल डियाक 1.5 गुणांसह नवव्या स्थानावर आहे, जो फ्रान्सच्या अलीरेझा फिरोजापेक्षा अर्ध्या गुणाने पुढे आहे.

दिवसाच्या इतर सामन्यांमध्ये कीमरने काळ्या मोहऱ्यांसह खेळताना गिरीशी बरोबरी साधली, तर वाशियर-लाग्रेव्हने व्हॅन फोरेस्टसोबत गुण वाटून घेतले. सिंदारोव्हने फिरोजाशी बरोबरी केली आणि डियाकने काऊआनाला बरोबरीवर रोखले. प्रज्ञानंदने सोविरुद्ध ‘बर्लिन डिफेन्स’ची निवड केली. या चालीच्या ‘क्लोज्ड व्हेरिएशन’च्या सुरुवातीच्या टप्प्यात सोने फारसा आक्रमकपणा दाखवला नाही. सामन्याच्या मधल्या टप्प्यात काही आक्रमक चाली रचत वेस्लीने वर्चस्व मिळवले. पण प्रज्ञानंदचे कौतुक करावे लागेल. कारण त्याने काही प्रतिचाली खेळत आपली स्थिती सावरली. अखेरीस सोने सामना बरोबरीत संपवण्याचा निर्णय घेतला.




# BCCI चा मास्टरस्ट्रोक; टीम इंडियात ‘रवींद्र जडेजा २.०’ ची एन्ट्री

**महाईन्यूज । मुंबई**

**भारतीय कसोटी संघात सध्या बरेच बदल पाहायला मिळणार आहेत. आतापर्यंत काही दिग्गज खेळाडूंनी कसोटी क्रिकेटला रामराम केला आहे. त्यामुळे त्यांची जागा भरुन काढण्यासाठी युवा खेळाडूंना संघात स्थान दिलं जात आहे. गेल्यावर्षी विराट कोहली, रोहित शर्मा, चेतेश्वर पुजारा आणि आर अश्विनसारख्या दिग्गज खेळाडूंनी कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली होती. येणाऱ्या काही महिन्यांमध्ये आणखी काही खेळाडू आहेत, जे कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा करू शकतात.**



त्याआधी बीसीसीआय त्यांची रिप्लेसमेंट शोधण्याच्या प्रयत्नात आहे. आता अफगाणिस्तानविरुद्ध होणाऱ्या मालिकेसाठी निवडण्यात आलेल्या भारतीय संघात बीसीसीआयने अशा एका खेळाडूला संघात स्थान दिलं आहे, जो पुढे जाऊन अनुभवी खेळाडू रवींद्र जडेजाची जागा घेऊ शकतो. कोण आहे का खेळाडू? जाणून घ्या.

आयपीएल २०२६ स्पर्धा झाल्यानंतर भारत आणि अफगाणिस्तान या दोन्ही संघांमध्ये एकमेव कसोटीची मालिकेचा थरार रंगणार आहे. या मालिकेसाठी बीसीसीआयकडून भारतीय संघाची घोषणा करण्यात आली आहे. या संघात युवा खेळाडू हर्ष दुबे आणि मानव सुथारसारख्या खेळाडूंना संघात स्थान देण्यात आलं आहे. हर्ष दुबे हे आयपीएलमध्ये चर्चेत असलेलं नाव नाही, त्यामुळे तुम्हाला नक्कीच प्रश्न पडला असेल की हा हर्ष दुबे आहे तरी कोण?

मुख्य बाब म्हणजे, भारतीय संघाला असा एक खेळाडू हवा होता जो भविष्यात रवींद्र जडेजाची जागा घेऊ शकतो. त्यासाठी हा परफेक्ट चॉईस आहे. कारण गोलंदाजी करण्यासह तो फलंदाजीतही योगदान देऊ शकतो. त्याने प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये २७ सामन्यांमध्ये गोलंदाजी करताना ४९ डावात १३३ गडी बाद केले आहेत. गोलंदाजीसह त्याने फलंदाजीतही योगदान दिलं आहे. त्याने ४४ डावात २५.६५ च्या सरासरीने १०२६ धावा केल्या आहेत.

यासोबतच हर्ष दुबेने देशांतर्गत क्रिकेटमध्ये आपल्या सातत्यपूर्ण कामगिरीने निवडकर्त्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. डावखुरा फिरकीपटू आणि उपयुक्त फलंदाज अशी त्याची ओळख तयार झाली आहे. कठीण परिस्थितीत संघाला विकेट मिळवून देण्याची क्षमता त्याच्यात असल्याचं अनेक सामन्यांत दिसून आलं आहे. त्यामुळेच त्याच्याकडे भविष्यातील अष्टपैलू खेळाडू म्हणून पाहिलं जात आहे. भारतीय संघ व्यवस्थापनालाही त्याच्यात दीर्घकालीन गुंतवणुकीची क्षमता दिसत आहे.

हर्ष दुबेने रणजी ट्रॉफीसह विविध स्पर्धांमध्ये प्रभावी गोलंदाजी करत प्रतिस्पर्धी फलंदाजांना अडचणीत टाकलं आहे. विशेष म्हणजे, तो लांब स्पेल टाकण्यास सक्षम असल्याने कसोटी क्रिकेटसाठी तो उपयुक्त पर्याय मानला जात आहे. फलंदाजीतही खालच्या फळीत महत्त्वाच्या धावा करण्याची त्याची क्षमता संघासाठी फायदेशीर ठरू शकते. त्यामुळेच त्याची तुलना आता हळूहळू रवींद्र जडेजासोबत केली जात आहे. बीसीसीआयने युवा खेळाडूंना संधी देण्याच्या धोरणानुसार हर्ष दुबेची निवड केल्याचं बोललं जात आहे. आगामी काळात भारतीय संघात मोठे बदल होण्याची शक्यता असल्याने नव्या खेळाडूंना तयार करण्यावर भर दिला जात आहे. अशावेळी हर्ष दुबे हा भारतीय संघासाठी महत्त्वाचा पर्याय ठरू शकतो.

### रणजी ट्रॉफी स्पर्धेतील कामगिरी

सध्या आयपीएल गाजवणाऱ्या खेळाडूंना थेट भारतीय संघात खेळण्याची संधी मिळते, पण हर्ष दुबे हे असं नाव आहे, जे रणजी ट्रॉफीत चमकलं आणि त्याच्या बळावर भारतीय संघात स्थान मिळवलं. २०२४-२५ मध्ये झालेल्या रणजी हंगामात त्याने दमदार गोलंदाजी केली होती. या हंगामात तो सर्वाधिक गडी बाद करणारा गोलंदाज ठरला होता. त्याने विदर्भाकडून खेळताना १० सामन्यांमध्ये ६९ गडी बाद केले होते. यासह त्याने सर्वाधिक गडी बाद करण्याचा रेकॉर्ड आपल्या नावावर केला होता. विकेट्सची रांग लावून त्याने निवडकर्त्यांना भारतीय संघात स्थान देण्यासाठी भाग पाडलं आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज™
epaper.mahaenews.com
ePaper
। गुरुवार ।
दि. 21 मे 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# प्रा . डॉ. आबाजी माने यांना मराठवाडा विद्यापीठाची ‘पीएच.डी.’ प्रदान

**महाईन्यूज ।**
**पिंपरी-चिंचवड**

**येथील डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. आबाजी माने यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या (बामू) वतीने शारीरिक शिक्षण या विषयात मानाची विद्यावाचस्पती (PH.D.) पदवी प्रदान करण्यात आली आहे.**

दिनांक ११ मे २०२६ रोजी विद्यापीठाच्या वतीने त्यांना अधिकृतपणे या पदवीने सन्मानित करण्यात आले.


प्रा. डॉ. आबाजी माने यांनी शारीरिक शिक्षण क्षेत्रातील अत्यंत महत्त्वाच्या आणि अभ्यासपूर्ण विषयावर आपले संशोधन पूर्ण केले आहे. त्यांनी “विशिष्ट भार प्रशिक्षण कार्यक्रमाचा वेटलिफ्टिंग खेळाडूंच्या शारीरिक सुदृढता व कौशल्य कार्यमान घटकांवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास” या विषयावर आपला शोधप्रबंध (THESIS) सादर केला होता. त्यांच्या या संशोधनाचा फायदा आगामी काळात वेटलिफ्टिंग क्षेत्रातील खेळाडूंची शारीरिक सुदृढता आणि कौशल्य वाढवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर होणार आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, विद्यार्थ्यांसाठी ते प्रेरणादायी ठरत आहेत. संशोधन क्षेत्रातील त्यांच्या योगदानामुळे शारीरिक शिक्षण आणि क्रीडा प्रशिक्षण पद्धतींना नवी दिशा मिळणार असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

## अभिनंदनाचा वर्षाव

प्रा. डॉ. माने यांना पीएच. डी. पदवी जाहीर झाल्याचे समजताच आकुर्डी येथील डी. वाय. पाटील शैक्षणिक संकुलासह संपूर्ण शैक्षणिक, क्रीडा व सामाजिक क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. महाविद्यालयाचे पदाधिकारी, प्राचार्य, प्राध्यापक वर्ग आणि विद्यार्थ्यांनी त्यांचे विशेष कौतुक केले आहे. आपल्या या यशाबद्दल बोलताना डॉ. माने यांनी, हे यश त्यांचे मार्गदर्शक, कुटुंबिय आणि डी. वाय. पाटील कॉलेज प्रशासनाच्या खंबीर पाठिंब्यामुळेच शक्य झाल्याची भावना व्यक्त केली. खेळाडूंच्या क्रीडा कौशल्यात वैज्ञानिक दृष्टिकोनातून सुधारणा करण्यासाठी आपले हे संशोधन उपयुक्त ठरेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.



D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY AKURDI PUNE
Think | Thrive | Transform
ADMISSION OPEN
A.Y. 2026



DYPIU is a trendsetting international university focused on preparing students for the future by offering innovative curriculum and unique features that foster creativity, entrepreneurship, & leadership.
It empowers students to be job creators rather than job seekers in the rapidly evolving technology landscape.

UG/PG Programs
- B.Tech. – Bioengineering
- B.Tech. – Chemical Engineering
- B.Tech. – Civil Engineering
- B.Tech. – Mechanical Engineering
- B.Tech. – Semiconductor Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering in Artificial Intelligence & Machine Learning in association with IBM
- B.Tech. – Computer Science and Engineering in Cyber Security and Forensic in association with IBM
- B.Sc. (Hons.) – Economics
- B.Sc. (Hons.) – Forensic Sciences
- BCA (Hons.)
- BBA (Hons.)
- BA (Hons.) – Journalism & Mass Communication
- BA (Hons.) – Liberal Arts
- BFA
- B.Design
- M.Sc. – Medical Biotechnology
- M.Sc. – Medicinal Chemistry
- M.Sc.– Computational Mathematics
- M.Tech. – Computer Science and Engineering in Quantum Computing.
- MCA
- MA – Journalism & Mass Communication
- MBA – Digital Business
- MBA – Executive
- Ph.D.

Follow us on

CONTACT
Phone Number: 8600091180
Website: dypiu.ac.in
Email: admission@dypiu.ac.in
APPLY NOW
D. Y. Patil International University, J Block, Sector 29, Akurdi, Pune 411044

# पाणीपुरवठा, MNGL व अमेनिटीज करावर सकारात्मक चर्चा!

## महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांची बैठक; संजीवन सांगळे यांची माहिती

**महाईन्यूज** I पिंपरी- चिंचवड

**चिखली-मोशी-चऱ्होली-पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशनच्या वतीने माननीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्यासोबत विविध प्रलंबित प्रश्नांवर महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत महाराष्ट्र नॅचरल गॅस (MNGL), सोसायट्यांचा पाणीपुरवठा, बिल्डरने दिलेल्या हमीपत्राचे उल्लंघन तसेच महानगरपालिकेकडून अमेनिटीजवर लावण्यात आलेल्या अतिरिक्त कराबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.**



बैठकीदरम्यान फेडरेशनच्या वतीने सोसायट्यांच्या समस्या ठामपणे मांडण्यात आल्या. विशेषतः बिल्डरने पाणीपुरवठा स्वतःच्या खर्चाने करण्याबाबत दिलेल्या हमीपत्राचे पालन न केल्यामुळे संबंधित बिल्डरवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. तसेच, हमीपत्रानुसार बिल्डरनेच सोसायट्यांना नियमित पाणीपुरवठा करावा, पाण्यासाठी सोसायट्यांनी केलेला खर्च बिल्डरकडून वसूल करून द्यावा, अशी मागणीही करण्यात आली.

याशिवाय ज्या सोसायट्यांमध्ये बिल्डरने ओ.डब्ल्यू.सी. मशीन बसवून दिलेली नाही, त्या संबंधित बिल्डरांवर तसेच अशा गृहप्रकल्पांना बांधकाम पूर्णत्वाचा दाखला देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी बैठकीत करण्यात आली. महानगरपालिकेकडून सोसायट्यांच्या अमेनिटीजवर लावण्यात आलेला अतिरिक्त कर चालू आर्थिक वर्षापासून रद्द करावा, हा मुद्दाही फेडरेशनच्या वतीने जोरकसपणे मांडण्यात आला.

या सर्व विषयांवर माननीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सकारात्मक भूमिका घेत संबंधित मागण्या मान्य केल्या. बिल्डरविरोधात कारवाई करणे, पाणीपुरवठ्याचा खर्च बिल्डरकडून वसूल करून देणे, बिल्डरमार्फतच पाणीपुरवठा सुनिश्चित करणे तसेच अतिरिक्त अमेनिटीज कर माफ करण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे यांनी बैठकीत सर्व प्रश्न ठामपणे आणि स्पष्टपणे मांडत सोसायटीधारकांच्या न्याय्य हक्कांसाठी आवाज उठविला.

> “ आयुक्तांच्या मीटिंगमध्ये बिल्डरने हमी पत्राचे उल्लंघन केल्यामुळे बिल्डरवर कारवाई करावी, हमीपत्रानुसार बिल्डरनेच पाणी पुरवावे, ज्या सोसायटीमध्ये बिल्डरने ओ.डब्ल्यू. सी. मशीन बसवून दिलेली नाही त्या बिल्डरवर आणि त्या गृहप्रकल्पाला बांधकाम पूर्णत्वाचा दाखला देणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करावी. चालू आर्थिक वर्षापासून सोसायट्यांवरती लावलेला कर रद्द करावा.हे मुद्दे मीटिंगमध्ये ठामपणे आणि स्पष्टपणे मांडले.
>
> **- संजीवन सांगळे, अध्यक्ष, चिखली-मोशी-पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशन.**

# डॉ. सुशांत पाटील ग्रुपतर्फे विद्यार्थ्यांच्या यशस्वी प्लेसमेंटचा भव्य गौरव

**महाईन्यूज** I
पिंपरी- चिंचवड

**शिक्षण क्षेत्रात वेगाने प्रगती करणाऱ्या डॉ. सुशांत पाटील ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सतर्फे विद्यार्थ्यांच्या यशस्वी प्लेसमेंटचा गौरव करण्यासाठी “Placements’ Gateway to Corporate” या भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना १००% प्लेसमेंट सहाय्य देत देशातील विविध नामांकित तसेच बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये मिळालेल्या यशस्वी नोकऱ्यांचा आनंद या कार्यक्रमातून साजरा करण्यात आला.**




## संस्थेच्या दृढ बांधिलकीचे प्रतीक

कार्यक्रमाचा समारोप प्लेस झालेल्या विद्यार्थ्यांसमवेत उत्साहपूर्ण केक कटिंग समारंभाने करण्यात आला. कार्यक्रमाचे सुंदर आणि प्रभावी सूत्रसंचालन यशदा पालनकर यांनी करत संपूर्ण कार्यक्रम अधिक आकर्षक व संस्मरणीय बनवला. “विद्यार्थ्यांनी सतत प्रगती करावी, प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व घडवावे आणि आपल्या करिअरमध्ये सर्वोत्तम यश मिळवावे,” हा या कार्यक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे डॉ. सुशांत पाटील आणि ॲड. अनुजा पाटील यांनी सांगितले. “Placements’ Gateway to Corporate” हा कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या यशाचा गौरव करणारा, प्रेरणादायी आणि शिक्षणासोबत करिअर घडविण्याच्या संस्थेच्या दृढ बांधिलकीचे प्रतीक ठरला.

डॉ. सुशांत पाटील ग्रुपच्या डॉ. डी. वाय. पाटील वराळे कॅम्पसमधील डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड इनोव्हेशन, डॉ. डी. वाय. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड एंटरप्रेन्योर डेव्हलपमेंट आणि डॉ. डी. वाय. पाटील टेक्निकल कॅम्पस येथील विद्यार्थ्यांनी भारतातील विविध भागांमध्ये कार्यरत असलेल्या प्रतिष्ठित राष्ट्रीय व बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये उल्लेखनीय प्लेसमेंट मिळवले आहे. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद, पालकांचा अभिमान आणि शिक्षकांचे समाधान स्पष्टपणे दिसून येत होते. प्रतिष्ठित कंपनीमध्ये नोकरी मिळवणे हे प्रत्येक विद्यार्थ्याचे स्वप्न असते आणि ते स्वप्न पूर्ण झाल्याचा आनंद या कार्यक्रमात अनुभवायला मिळाला.

कार्यक्रमादरम्यान संस्थेचे अध्यक्ष तथा चेअरमन डॉ. सुशांत पाटील आणि सचिव तथा CEO ॲड.अनुजा सुशांत पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना कॉर्पोरेट क्षेत्रातील आव्हाने, प्लेसमेंटसाठी आवश्यक प्रशिक्षण रचना, व्यक्तिमत्त्व विकास तसेच वेगाने वाढणाऱ्या AI युगाशी जुळवून घेण्याचे महत्त्व याबाबत सखोल मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी सातत्याने कौशल्यविकास करत आत्मविश्वासाने करिअर घडवावे, असे आवाहन त्यांनी केले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. संतोषराव बोर्डे, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना उद्योगविश्वातील संधी, अपेक्षा आणि करिअर घडविण्यासाठी आवश्यक तयारी याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले.

यावेळी प्राचार्य डॉ. सुरेश माळी, प्राचार्य डॉ. मेघना भिलारे, प्राचार्य डॉ. सुरेश शिरभद्रकर, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी प्रा. ललित पवार, रजिस्ट्रार प्रा. प्रदीप खांडवे, चीफ अकाउंट ऑफिसर श्री. संजय भोर, प्रा. राहुल मिश्रा, प्रा. मयुरेश चोळकर, प्रा. आशिष जावके, प्रा. श्वेता बोर्से तसेच सर्व विभागप्रमुख व प्राध्यापक उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी प्रेरणादायी मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला असून, संपूर्ण कॅम्पसमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. विद्यार्थ्यांच्या यशामुळे संस्थेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षण, उद्योगाभिमुख प्रशिक्षण आणि १००% प्लेसमेंट सहाय्याच्या ध्येयाला पुन्हा एकदा अधोरेखित करण्यात आले.

# शहरात 'जनगणना 2027'ला सुरुवात

## प्रगणक व पर्यवेक्षक घरोघरी जाऊन माहिती संकलित करणार; 14 जूनपर्यंत मोहीम चालणार

**महाईन्यूज I**
**पिंपरी- चिंचवड**

**जनगणना 2027 च्या पहिल्या टप्प्यांतर्गत पिंपरी-चिंचवड शहरात घर यादी व घरगणनेच्या मोहिमेत प्रत्यक्ष घरोघरी जाऊन बुधवारपासून (दि. 20) सुरुवात करण्यात येणार आहे. त्यासाठी महापालिकेने एकूण 6 हजार 702 पर्यवेक्षक व प्रगणक नेमले आहेत. ती मोहीम 14 जूनपर्यंत चालणार आहे.**




महापालिकेने या मोहिमेसाठी महापालिका व खासगी शाळेचे शिक्षक तसेच, महापालिकेचे कर्मचारी असे तब्बल सहा हजार 702 कर्मचारी नेमले आहेत. त्यात महापालिका शाळा व आयटीआयचे एकूण 5 हजार 502 शिक्षक आहेत. तर, महापालिकेच्या विविध विभागांचे 1 हजार 400 कर्मचारी आहेत. एक प्रगणक 200 घरांची मोजणी करणार आहे. तर, एका पर्यवेक्षकांकडे तीन प्रगणकांचे नियंत्रण असणार आहे.

प्रगणक घरोघरी जाऊन कुटुंब, मालमत्ता, आहार, घर, वाहन आदींची माहिती विचारणार आहेत. घराची माहिती, इमारत क्रमांक, मजला, घराचा प्रकार, कोणते धान्य वापरले जाते, मोबाईल क्रमांक, कुटुंबातील सदस्यांची संख्या, कुटुंबप्रमुखाचे नाव, लिंग व जात, घर स्वत:चे की भाड्याचे, खोल्यांची संख्या, घरात राहत असलेल्या विवाहीत जोडप्यांची संख्या आदी माहिती विचारली जाणार आहे. पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत, प्रकाश व्यवस्था, शौचालय व बाथरुमचा प्रकार, स्वयंपाकघर व गॅसजोडणी तसेच, मालमत्तेसंदर्भात रेडिओ, टीव्ही, इंटरनेट, संगणक किंवा लॅपटॉप, फोन, मोबाईल, दुचाकी किंवा चारचाकी वाहन आहे का आदी माहिती नोंदवली जाणार आहे.

“ प्रत्येक नागरिकाने ही आपली जबाबदारी समजून प्रामाणिक व अचूक माहिती देऊन या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा. जनगणेसाठी संकलित केली जाणारी सर्व माहिती ही पूर्णपणे गोपनीय राखली जाते. ती केवळ शासकीय नियोजनासाठीच वापरली जाते. नागरिकांनी कोणतीही शंका न बाळगता विश्वासाने व निःसंकोचपणे योग्य माहिती द्यावी. या मोहिमेसाठी जनजागृती करण्यात आली आहे.

- **सचिन पवार,** उपायुक्त तथा शहर जनगणना अधिकारी, महापालिका.

### 5 जूनपर्यंत 95 टक्के नोंदणी केली जाणार

प्रगणकांनी आपल्या मोबाईलमध्ये जनजगणनेचे ॲप शनिवारी (दि. 16) डाऊनलोड केले. दुसऱ्या दिवशी रविवारी (दि. 17) लॉगिंग करून नेमून दिलेल्या परिसराचा अचूक नकाशा तपासून घेतला. सोमवारी (दि. 18) परिसरातील घरांचा कच्चा नकाशा तयार करण्यात आला. तर, प्रत्यक्ष घरोघरी जाऊन माहिती नोंदवण्यास बुधवारपासून (दि. 20) सुरुवात केली जाणार आहे. दोनशे घरांपैकी 25 मेपर्यंत 40 टक्के, 30 मेपर्यंत 70 टक्के आणि 5 जूनपर्यंत 95 टक्के नोंदणी पूर्ण करण्याचे वेळापत्रक आहे. उर्वरित दिवसांत ज्या घरी लोक भेटली नाहीत, त्या घरांना भेट दिली जाणार आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

## महापौर रवी लांडगे यांना धमकी; ‘समाधान’ हेल्पलाईनवर फोन करणारा ताब्यात

**महाईन्यूज I पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवडचे महापौर रवी लांडगे यांना मारण्याची धमकी देणाऱ्या व्यक्तीला भोसरी पोलिसांनी तांत्रिक तपासाच्या आधारे ताब्यात घेतले. पोलीस आयुक्तालयाच्या ‘समाधान’ हेल्पलाईनवर फोन करून धमकी देण्यात आली होती. संबंधित व्यक्तीची मानसिक स्थिती ठीक नसून नैराश्यातून त्याने ही धमकी दिल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. त्यामुळे पोलिसांनी त्याला समज देऊन घरी सोडले आहे.**



“ समाधान हेल्पलाईनवर अनोळखी व्यक्तीचा फोन आला होता. फोनवरील व्यक्तीने महापौरांबाबत वक्तव्य केले. त्याबाबत स्थानिक पोलिसांना माहिती देण्यात आली. पोलिसांनी संबंधित व्यक्तीला ताब्यात घेतले असून पुढील कारवाई सुरू आहे.

- **डॉ. शिवाजी पवार,** पोलीस उपायुक्त, गुन्हे शाखा.

आशिष जमदाडे पाटील (रा. चिखली) असे फोन करणाऱ्या व्यक्तीचे नाव आहे. तो भोसरी एमआयडीसी परिसरातील एका कंपनीत सुरक्षा रक्षक म्हणून काम करतो. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी (दि. १९) दुपारी चारच्या सुमारास पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या ‘समाधान’ हेल्पलाईनवर एक फोन आला. फोन करणाऱ्या व्यक्तीने महापौर रवी लांडगे यांना मारण्याची धमकी दिली. या प्रकारानंतर पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला.

समाधान हेल्पलाईनवर आलेल्या मोबाईल क्रमांकाचे तांत्रिक विश्लेषण आणि लोकेशन तपासण्यात आले. त्यानुसार, पोलिसांनी आशिष पाटील याचा चिखली परिसरातून शोध घेत त्याला ताब्यात घेतले. भोसरी पोलीस ठाण्यात आणून त्याची चौकशी करण्यात आली. चौकशीदरम्यान त्याने नैराश्येतून हा फोन केल्याची कबुली दिली.

पोलिसांनी त्याच्या नातेवाईकांकडे तसेच तो राहत असलेल्या परिसरात चौकशी केली असता त्याची मानसिक स्थिती ठीक नसल्याचे समोर आले. त्यामुळे पोलिसांनी त्याला कडक समज देत पुढील काळात अशा प्रकारचे कृत्य न करण्याचा इशारा दिला.

या घटनेमुळे काही काळ परिसरात खळबळ उडाली होती. मात्र,



पोलिसांनी वेगाने कारवाई करत संबंधित व्यक्तीचा शोध लावल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले. धमकीच्या फोननंतर महापौर रवी लांडगे यांच्या सुरक्षेचाही आढावा घेण्यात आला. कोणतीही अफवा पसरू नये, यासाठी पोलिसांनी नागरिकांना संयम बाळगण्याचे आवाहन केले आहे. तसेच आपत्कालीन हेल्पलाईनचा गैरवापर करणे हा गंभीर प्रकार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले. मानसिक तणाव किंवा नैराश्याच्या अवस्थेत असलेल्या व्यक्तींनी समुपदेशनाची मदत घ्यावी, असे आवाहनही करण्यात आले. भविष्यात अशा प्रकारच्या घटनांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही पोलिस प्रशासनाने दिला आहे. या प्रकरणानंतर शहरातील आपत्कालीन हेल्पलाईन सेवांच्या सुरक्षितता आणि विश्वासार्हतेबाबत पोलिस प्रशासन अधिक सतर्क झाले असून अशा कॉल्सची गंभीर दखल घेतली जाणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

**PRIYADARSHANI SCHOOL & JR. COLLEGE**
MOSHI

**43 YEARS OF NURTURING VALUES, EXCELLENCE AND TOMORROW'S LEADERS.**



# ADMISSIONS OPEN 2026-27

Nursery to Grade 5

## WHY CHOOSE PRIYADARSHANI SCHOOL?

43 Years of Excellence in Education | Advanced Robotics & Computer Labs Experienced and Dedicated Faculty | Multiple Sports Grounds for All-Round Development Proven 100% Results in Grade X | A Perfect Blend of Tradition and Innovation

+91 9890613333 | +91 9373073077

pgosm05@gmail.com www.priyadarshanischoolmoshi.in